नि.दि.दा.क्रं.०१/२०२०
जनाबाई वि. रघुनाथ व इतर
सीएनआर क्रं.एमएचजेजी१७०००२६२२०२०

## निशाणी क्र.३६ वरील आदेश

(पारीत दिनांक २५ सप्टेंबर, २०२३)

प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांनी सदरचा अर्ज त्याचे विरुध्द पारित झालेला विना खुलासा तसेच एकतर्फी दावा चालविण्याचा आदेश रद्द होवुन मिळण्याबाबत केला आहे.

२. प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांचे असे कथन आहे की, दाव्याची नोटीस मिळाल्यानंतर ते न्यायालयात हजर झाले. परंतु, दरम्यानच्या काळात कोरोना सदृष्य परिस्थीती उदभवल्यामुळे कोर्टाचे कामकाज बंद होते. तसेच, वादी व प्रतिवादी यांच्यात आपसात तडजोडी करणे संदर्भात बोलणे सुरु असल्याने आणि प्रतिवादी क्रं.२ हया वयोवृध्द आहेत त्यामुळे त्यांना हजर राहुन लेखी खुलासा सादर करता आला नाही. याकारणास्तव, दि.१३/१२/२०२१ व दि.२४/०१/२०२३ त्याचेविरुध्द दावा विना खुलासा व एकतर्फी चालविण्याचा आदेश पारित झाला. तरी, प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांनी त्यांचेविरुध्द पारित झालेला दावा विना खुलासा व एकतर्फी चालविण्याचा आदेश रद्द होवुन मिळण्याची विनंती केली.

३. वादी यांनी सदर अर्जास तिव्र विरोध करुन असे कथन केले आहे की, अर्जातील मागणी व म्हणने हे सबळ व संयुक्तीक नसुन खोटे असल्याने अर्ज रद्द करण्यात यावा. अर्ज मंजुर केल्यास रु.१०,०००/- कॉस्ट देण्यात यावी.

४. प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांचे विद्वान विधीज्ञ श्री.टि.एस. पटेल व वादी तर्फे विव्दान विधीज्ञ श्री.एस.डी.कोचुरे यांचा युक्तीवाद ऐकला.

५. दाव्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांना दाव्याचे समन्स प्राप्त झाले व ते न्यायलयासमक्ष हजर झाले. परंतु, त्यांनी मुदतीत त्याचा खुलासा सादर न केल्याने दि.१३/१२/२०२१ रोजी दावा प्रतिवादी क्रं.१,२,३ व ५ विरुध्द विना खुलासा व दि.२४/०१/२०२३ रोजी प्रतिवादी क्रं.४ विरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत झाला. तदनंतर दि.१७/०८/२०२३ रोजी प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींना कोरोना सदृष्य परिस्थीतीमुळे, आपसात तडजोडीची बोलणी सुरु असल्यामुळे व प्रतिवादी क्रं.२ हया वयोवृध्द असल्याने त्यांना मुदतीत त्यांचा खुलासा सादर करता आला नाही असे कथन केले आहे. सदर दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर असणे गरजेची आहे. परंतु, सदर दाव्याला झालेला विलंब व वादीस झालेला त्रास दुर्लक्षीत करीता येणार नाही. या सर्व बाबींचा सारासार विचार करीता, वादीस झालेला त्रास आर्थिक स्वरुपात नुकसान भरपाई देवुन भरुन काढता येवु शकतो. करीता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांचा नि.क्रं.३६ अर्ज रु.२,०००/- (दोन हजार रुपये) कॉस्टसह मंजुर करण्यात येत आहे.
२. दि.१३/१२/२०२१ रोजी नि.क्रं.०१ वर पारीत झालेला दावा विना खुलासा व दि.२४/०१/२०२३ रोजी दावा एकतर्फी चालविण्याचे आदेश बाजुला सारुन (Set Aside) प्रतिवादीनां त्याची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.
३. प्रतिवादी क्रं.२ ते ५ यांनी कॉस्ट रु.२,०००/- (दोन हजार रुपये) वादीस दिल्यानंतर त्याची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावे.

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2023.09.26 11:25:40 +0530

(जी. ओ. वानखडे)

दि. २५/०९/२०२३. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,मुक्ताईनगर.